"Paniwali Anjira"
Lata Bhise

# पाणीवाली अंजिरा

बाहेर कालवा झाला. ती चुलीपासूनच कानोसा घेऊ लागली. झोपडीच्या बाहेर म्हाताऱ्या सासूशी गप्पा मारत बसलेला नवरा उठून पलीकडे गेलेला तिनं पाहिला. आठ वाजून गेलेले होते. अजून जेवणं झाली नव्हती. लाकडं ओली होती. पेटेनात ! कोरड्यास व्हातचं होतं... झोपडीभर दाटलेल्या धुरातून तिच्या कानावर बाहेरचे आवाज येत होते.

'आनंदा ए आनंदा' भाकरी तव्यावर टाकता टाकता तिने पोराला बोलावलं... 'आत्तीबाय, आत्तीबाय कसला हो कालवा ?' तिच्या भाकरी चालूच होत्या. म्हाताऱ्या सासूला तिची हाक ऐकू गेली नव्हती. कालवा जोरात सुरू झाला तशी सासू उठली ... झोपडीच्या दारातून सासू पलीकडे गेलेली बघून लगबग तीही झोपडीच्या दारात आली.

गेनबाच्या दारात मांगवाड्यातली म्हातारी कोतारी, पोरं, बाळं, बायका सारी गोळा झाली होती आणि वलूबाय जोराजोरात बोलत होती. कुणाशी भांडण तर वाटत नव्हतं... अंजिरा तशीच आत आली. चुलीतलं लाकूड काढलं... भाकरी कशीतरी भाजली आणि लुगड्याला हात पुसत ती वलूबायच्या दाराकडं गेली.

'माणसं हायत का जनावरं ? एवढी बी माणुसकी नाय... म्हार मांग असलो म्हणून काय असलं पाणी प्यावं ?' अंजिरा दिसताच वलूबाई म्हणाली.

'अंजाक्का, झिऱ्यात मेलेलं कुत्रं टाकलंय बग पाण्याला घाण मारतीय ! कुठून पाणी आणायचं ? '

म्याललं कुत्रं ? अन् कुणी टाकलं ? पोरांना दी दोन ठेवून. '

'आगं आपली पोरं आसतीतर कानफाटात लावल्या असत्या. पर कुत्रं आपलं नाय ! कुत्रं म्हादा पाटलाचं हाय ! आपलीं पोरं आपल्याच झऱ्यात मेलेलं कुत्र टाकील काय ?

तसं हणमंत म्हणाला, 'सकालच्यालाच पाण्यात टाकलं आसलं. म्या १ वाजता एक खेप केली. पाण्याला कायसुदीक वास नव्हता. आता वलूकाकीका सोबत गेलो थोडं पाणी प्यायला लागलो तर ही घाण मारतीय. म्हणून पाण्यात पाहिलं तर कडेच्या बाजूला कुत्रं फुगून वर आलेलं !...

तेवढ्यात शांतीनं पाणी आणलं, नुकत्याच आलेल्या दोघातिघांनी वास घेऊन पाहिला. अंजिरा चिडली, वलूबाई तर संतापून लाल झाली होती.

आधी गावातल्या सगळ्यांचा पाणवठा वेगळा! मांगवाड्याचा वेगळा ! 'गतसालच्या दुक्काळात पाण्याची बोंब होती तर योक बी आपन होऊन म्हणाला न्हाहे की त्या हिरीहून पाणी भरा. मांगवाड्याच्या झिऱ्यात मेलेली कुत्री मात्र टाकतात ' वलूबाई आणि अंजीराचा संताप बाहेर पडत होता.

'ए वलूबाई, अंजिरा. आता गप बसा ! सक्कालच्याला बगू. आता अंधाराचं झिऱ्यात कोन उतरलं ! जा जाऊन चार घास खावा. ' तशी अंजिरा म्हणाली आसं गप बसून न्हातो ना म्हणून इथं दिवं येत न्हाईत! मागच्या दिपवाळीला मांगवाड्यावर वाण्या पाटलाच्या पोरानी का दगडं फिकली रं ? अन् दुसऱ्या दिशी पाटील म्हंतो ल्हान पोरं. तेनां काय कळतं ? फेकली दगडं मांगवाडा गावाच्या भाईर. तितपातूर येऊन नेमकं मागवाड्यावर दगडं फेकावीत हे बरं ल्हान पोरांना कळतं ? आणि आता पाण्याच्या डव्हात मेलेलं कुत्रं ! कसं पाणी प्यावं ? माणसं इतकी वाईट का वागतात

घराकडे येता येता ती बोलत होती, 'आमची माण

ही आसलीच ! मरतं मढचावानी. मागे बरावर गोट पडले, आता झिन्यात मेलेलं कुत्रं ! उद्या जिव्ह मारतील. तरी ये गप बसनार म्हन !'

अंजिरानं दोन घास खाल्ले. पोराला छातीशी घेऊन ती अंधार बघत राहिली. पाटलाच्या शेतावर काम करत असलेला तिचा नवरा पलीकडे झोपला होता. म्हातारी सासू कण्हत होती.

सगळा मांगवाडा झोपडयांमध्ये वेदना घेऊन झोपला होता. गावातल्या विजेच्या खांबाखाली चार दोन माणसं पत्ते खेळत बसली होती. मांगवाडयाच्या अंधाराशी एखाद्या कुत्र्याचं केकाटणं संभाषण करी इतकंच ! दूध देणाऱ्या शेळचा मान टाकून झोपल्या होत्या. डालग्यात घातलेल्या कोंबडयाप्रमाणे सारी माणसं झोपडयाझोपडयातून झोपून राहिली होती.

मांगवाडयातली रखमाचा, अंजाक्काचा, वलूबाईचा दिवस सूर्य उगवायच्या आत सुरू होतो. पहाटे पहाटे केव्हातरी अंजिराला झोप लागली. वलूबाईच्या हाकानी तिला परत जाग आली. झाडावर कावळयांची कावकाव सुरू झाली होती.

अंजिरा बाहेर गेली. जाताना पोराच्या अंगावर पांघरूण घातलं. ' अंजे आता गं कसं ? आंगुळीला पाणी नाय आन् रांधायचं कवा ? दोघी मिश्री लावत एकमेकीशी बोलू लागल्या.

आपण आसं केलं तर ? आता आंधार हाई. सगळचाजणींना उठवू आनी गावातल्या हिरीवरून गुपचूप पाणी आणून टाकू. सूर्य उगवायच्या अगुदर थोडा वेळच त्ये पाण्याला लागत्यात. ' ए येडपटा आसं काय दररूज करनार हाइत का ? दिवसा जसं काय आपण कदी बी एक पण खेप आणत नाय ? आपल्या झिन्यातलं कुत्रं काढून पानी निवळायला ३।४ दिवस लागतील. तोपर्यंत काय फाटंचच चोरून आणायचं व्हय ?'

'आन् मग काय त्येंच्या विहिरीवर राजरोस पाणी भरायचं ? बाये ? हीर इटाळली ना तर टक्कूरी फुटतील आपली !'

मग काय कोसावरच्या शेंदुर्णीच्या बुद्धवाडयातून आणायचं व्हय ? आपलं पोट हातावर हाये ! पाण्यातच चार तास गेला तर रोज मिळेल व्हय ? '

अंजिरा पचदिशी थुंकली. आणि म्हणाली, ' वलूबाय एक बग... आपन आसं करू जरा उजाडू दे ! सगळचाजणी बरोबर निघू. तुझा बबन, भीमा, राणूबा, झालस तर सोनबाकाका सगळचांना बरोबर घेऊ. हे बग तिथं तुमी काय बी घाबरू नका. मी काय बोलायचं ते बोलते. तुमी सारी हो ला हो करा. आज त्या किरडीवाल्याचं मढंच बांधनार हाय !

देवीच्या नावानं सोडलेल्या पोळाप्रमाणे सूर्याची किरणं गावात शिरू लागली होती. चार वर्षात सावकारीवर माडी उठवणाऱ्या गेनसल वाण्यानं दुकानाच्या फळचा उघडल्या होत्या. म्हादा पाटील शेतावर आज काय कामाचा निरोप द्यावा त्या कामाची यादी करत मिशीवर पीळ देत दिंडी दरवाज्यातून रस्त्याकडे बघत होते. धाकटी पाटलीन पाण्याच्या खेपा करीत होती. चावडीसमोरच्या विहिरीवर धाकटी पाटलीण, चौगुल्याची रखमा, वाण्याची कमल पाणी भरत होत्या. कुणी येत होतं. कुणी जात होतं.

तेवढयात कमल म्हणाली, ' अगोबाई... त्ये बग !' तशा साऱ्या थांबल्या. मांगवाडयातल्या साऱ्याजणी कळशा, हांडे घेऊन येत होत्या. त्या जवळ आल्या. विहिरीजवळ थांबल्या. अंजिराबाई म्हणाली, ' कमलबाय... घ्या लवकर पाणी वढून... आमाला बी खेपा करायच्यात.'

धाकटी पाटलीण टकमक टकमक बघत होती. ती काहीच बोलेना. कमलबाई कळशी विहिरीत सोडेना. चौगुल्याची रखमा किंचीत किंचाळलीच, ' मांगाला पाणी भरायला दीऊन काय पाणी बाटवावं व्हय गं भवाने ?'

बऱ्या बोलानं पाणी भरू देत ... मांगवाडयाच्या पाणोठयावर मेलेलं कुत्रं टाकलय ना तुमी. आता दररोज आमी इथूनच पाणी भरनार हाई. घे भराभर पाणी वढून. ' अंजिराही फाडकन् बोलली. तशी धाकटी पाटलीण तरातरा पुढं आली.

' हे बग वलूबाई, ही विहीर गावाची हाय...तुमाला तुमचा झिरा हाय... मेलेलं कुत्रं काढून टाका. तिथून पाणी भरा... इथं पोहऱ्याला हात तर लावून बघ !

अंजिरा, बबन, वलूबाई सारेच पुढे सरसावले. ' परवा वस्तीवर दगडं मारली. काल झिन्यात कुत्रं टाकलं. आता गप बसणार न्हाई इथूनच पाणी नेणार.

आमच्या पाणवठ्यात कुत्रं टाकता ना ? देवाला म्हनं शेजारी कुत्रा चालतो ... गाय चालती. सगळी जनावरं चालतात पण माणसाचा इट्टाळ ! त्या देवाची ही भक्त ! घे भराभर पाणी वडून. आमाला काम हायती !'

तोपर्यंत सारा गाव जमा झाला होत. मांगवाड्याचे लोक हातात कळशा घेऊन उभे होते. धाकटी पाटलीण का येईना म्हणू ! मोठी पाटलीण, चौगुलणीची धाकटी जाऊ साऱ्या तिथं जमा झाल्या होत्या. अंजिरा संतापली होती. रहाटापासून हटत नव्हती. पाटील लांबूनच बघत होते.

'हे बग बाजूला सरणार हाईस का न्हाई ? भ्या पाणवठ्यातलं कुत्रं काढून दिलं न्हाई ! ते कुत्र कुणाचं हाय ? कुणी टाकलंय ह्यासाठी पोलिसाकडं जाईन बग तालुक्याला. आता आमी बी गप बसणार न्हाई ! जातीवरनं शिव्या देतीया ! आमाला बी कायदं कळत्यात. ए वलूबाई ये. ही बया बऱ्या बोलानं पाणी भरून देणार न्हाई !' अंजिरानं चौगुलणीचा दोर चाकावरून काढला. बरोबर आणलेला पोहरा पाण्यात टाकला नि भरभरा पाणी ओढू लागली. तशी वलूबाई पुढं सरली...साऱ्याजणी पुढे सरल्या. चाकाच्या कुईकुई आवाजासरशी सगळ्यांनी भराभरा पाणी भरलं.

अंजिराच्या एका धाडसानं केवढी जादू झाली होती मांगवाड्यावर.

अंजिरानं दीडदोनशे मनं एक केली.

पाटील एका शब्दानं बोलू शकला नाही.

अन्यायाविरुद्ध शस्त्र उपसून लढणाऱ्या सावळा मांग फकिराची भावंडं होती ती.

पाण्यासारख्या साध्या गोष्टीला नकार देणाऱ्या चौगुलणीला, पाटलिणीला अंजिरानं एक होऊन धक्का दिला होता. न पेक्षा अंजिरा तालुक्याला धावत गेली असती हे त्यांना माहित होतं.

दहा पंधरा दिवसात सकाळी मिश्री लावताना अंजिरा आणि वलूबाईची गाठ पडते. गावच्या पाणवठ्यावर आता सर्वजण पाणी भरतात. वलूबाई म्हणते, 'अंजिरा, यवढं भ्या वाटत होतं बग ! म्हनलं आता फुटतय टक्कुर तुजं ! पाटलीण आणि चौगुलीण उपटतीय झिंज्या तुज्या ! काय लाह्यासारख्या फडाफडा उडत व्हत्या दोघी रागानी !'

अंजिरा पचकन् थुंकून नेहमी म्हणते, 'वलूबाई न्यायासाठी भांडावं. आगं आपन एक झालो तर असले छप्पन पाटील पाटलीणी पोहऱ्यानी बांधून फेकून दिऊ.'

अंजिराची गोष्ट आजूबाजूच्या गावात माहीत झाली आहे. सारीजण तिला पाणीवाली अंजिरा म्हणतात.

अंजिरा मनातनं लाजते आणि स्वतःलाच सांगते, 'आसं एक झाल्याबिगर काय सुदीक होत नाई ! काल पाण्यासाठी भांडलो ! उद्या तुकड्यासाठी भांडायचय !

(वास्तव घटनेवर आधारीत)

— लता भिसे

